ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, १८ फेब्रुवारी, १९७० | अंक ४



**तुम्हांला इंग्रजी येत नसेल तशी चिंता नाही. महाराष्ट्र बँकेत प्रादेशिक भाषेतूनही व्यवहार केला जातो**



तुमचा लाखो रुपयांचा व्यवहार इंग्रजीवाचून अडणार नाही.
महाराष्ट्र बँक म्हणजे तुमची भाषा समजणारी बँक तुमच्या जिव्हाळ्याची बँक।

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफीसः ११७७, बुधवार पेठ, पुणे-२.

8961

## बँकेच्या कर्मचाऱ्याला तीन वर्षे सक्तमजुरी

### सहकारी कर्मचाऱ्याचा विश्वासघात

सुरेंद्र नारायण मेनन हा मुंबईत स्टेट बँकेच्या कचेरीत स्टाफ ऑफिसर म्हणून काम करीत होता. अबदुल एस्टेटसने बँक ऑफ बरोडाच्या कुलाबा शाखेवर १०,००० रुपयांचा चेक इंडियन कन्स्ट्रक्शन कंपनीच्या नावावर २० एप्रिल १९६८ रोजी काढला होता, तो मेननला त्या कंपनीच्या खाती जमा करण्यासाठी देण्यात आला. मेननने कौंटरफॉइल स्लिपवर सही केली, परंतु मूळ पेइंग-इन स्लिप नष्ट करून टाकली. नवी स्लिप स्टेट बँकेतच काम करणाऱ्या बी. एस. मारू याच्या नावाने लिहिली आणि मारूच्या खात्यात चेक भरला; इंडियन कन्स्ट्रक्शन कंपनीच्या खात्यात भरलाच नाही. नंतर मेननने मारूला सांगितले, की चेक कॅश करण्यासाठी आणलेला होता आणि तो मारूच्या खात्यात भरला होता, तेव्हा मारूने सेल्फ अथवा बेअरर चेक द्यावा. त्याप्रमाणे मारूने चेक दिला, तो मेननने स्टेट बँकेच्या फोर्ट शाखेत जाऊन वटविला आणि तो मुंबई सोडून निघून गेला. ११ मे रोजी तो परत आला, तेव्हा त्याने बहुतेक पैसे खर्च करून टाकलेले होते. इंडियन कन्स्ट्रक्शन कंपनीने काढलेला एक चेक बँकेत पास होऊ शकला नाही, तेव्हा हे प्रकरण उजेडात आले. मेननने चीफ अकौंटंटजवळ गुन्हा कबूल केला आणि शिल्लक असलेले ३,९०० रुपये परत केले. परंतु, कोर्टात त्याने आरोप अमान्य केला. बृहन्मुंबईच्या सेशन्स कोर्टाने त्याला ३ वर्षे सक्तमजुरीची आणि १,५०० रु. दंडाची शिक्षा ठोठावली.

---

## स्त्रियांची वेतनाबाबत पुरुषांशी बरोबरी होणार

ठराविक कामाला ठराविक वेतन स्त्रियांनाही देण्याची सक्ती करणारे बिल ब्रिटिश कॉमन्स सभेत मांडण्यात आले आहे. १९७५ पूर्वी ही सुधारणा घडवून आणली पाहिजे. ग्रेटब्रिटनमध्ये सुमारे ९० लक्ष स्त्रिया काम करतात, त्यांपैकी निम्म्यापेक्षा अधिक विवाहित आहेत. एकतृतीयांश स्त्रियांना सध्या पुरुषांच्या इतके वेतन मिळते. या कायद्यामुळे, एकूण वेतनाचा खर्च ३·५% वाढेल. परंतु काही विवक्षित धंद्यांत ती वाढ त्यापेक्षा खूपच अधिक होईल.

---

## धूम्रपानामुळे आयुष्य पाच वर्षांनी कमी होते

वीस वर्षांचा माणूस त्या वयापासून सिगारेट्स ओढीत राहिला तर तो धूम्रपान न करणारांपेक्षा पाच वर्षे कमी जगण्याचा संभव आहे. धूम्रपानामुळे होणाऱ्या रोगामुळे ग्रेटब्रिटनमध्ये दरसाल ५०,००० पेक्षा जास्त लोक मृत्युमुखी पडतात. धूम्रपान न करणारापेक्षा ते करणारात छातीच्या कॅन्सरचे प्रमाण २० पट आढळते.

---


# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बेक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १४,६२,२०,००० |
| ठेवी | रु. | ७४,५७,३६,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,४२,०९,१२,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक



तारेचा पत्ता "मॉर्गेज"
मुख्य कार्यालय दूरध्वनी २६१४९७
उपकार्यालय क्र.१ दूरध्वनी २६०३०६
उपकार्यालय क्र.२ दूरध्वनी २९०००६

# दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, २ रा माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९१५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६८ अखेर बँकेचे भागभांडवल ५ कोटी २८ लक्ष रु., गंगाजळी ३० लक्ष रु., ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २१ कोटी रु. व येणे कर्ज ६७ कोटी रु. आहे.

भी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

गो. प. भावे
कार्यकारी संचालक

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १८ फेब्रुवारी, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*


## सहकारी संस्थांच्या थकबाकीत भयानक वाढ

### रिझर्व्ह बँकेने लक्ष वेधले

१९६६–६८ मधील सहकारी चळवळीचा रिझर्व्ह बँकेने घेतलेला तपशीलवार आढावा नुकताच प्रसिद्ध झाला आहे. "ह्या काळात सहकारी चळवळीची 'तीव्र पीछेहाट'च झालेली आहे. राज्य आणि मध्यवर्ती सहकारी बँकांकडे ठेवी जमण्याची प्रगती मंदावली आहे. बँकांच्या कर्जव्यवहारातील वाढ मंदावली आहे आणि थकबाकीत प्रचंड वाढ झाली आहे" असा रिझर्व्ह बँकेचा स्पष्ट अभिप्राय आहे. १९६६–६७ च्या मानाने १९६७–६८ मध्ये मात्र पिकांची परिस्थिती सुधारल्यामुळे सहकारी चळवळीला पोषण मिळाले.

### नवचैतन्य निर्माण करण्यात दिरंगाई

१९६५ साली राज्यांच्या सहकार मंत्र्यांच्या परिषदेने सुचविले होते की, प्राथमिक पतपेढ्यांत नवचैतन्य निर्माण करण्याचे कार्य १९६६–६७ अखेर पुरे करण्यात यावे. परंतु, त्याबाबत कार्य इतके मंद गतीने चालू आहे की, १९६७–६८ मध्येही प्राथमिक पतपेढ्यांची परिस्थिती दुर्बलच आहे.

(१) २२,७१४ सोसायट्यांचे काम बंद पडलेले होते. म्हणजे, २ कोटी, ९४ लक्ष लोकवस्तीच्या ४१,५०४ गावांवर त्याचा अनिष्ट परिणाम झाला; देशाच्या ७% गावांतील ही परिस्थिती आहे.

(२) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतील लक्ष्याप्रमाणे ३·७ कोटी सभासद असायला हवे होते. प्रत्यक्षात ते २·६३ कोटीच आहेत. चालू सोसायट्यांचा फायदा एकूण ग्रामीण लोकसंख्येच्या ३३% लोकांनाच मिळत आहे.

(३) एकूण सभासदांपैकी कर्ज घेणाऱ्या सभासदांची संख्या फक्त ३८% आहे.

(४) एकूण १,७१,८०४ सोसायट्यांपैकी ७०% सोसायट्या नफ्यात चालल्या.

(५) १९६७–६८ मधील (१९६६–६७ संबंधीचे ऑडिट) ऑडिटप्रमाणे ८२% सोसायट्या क, ड आणि इ ह्या वर्गात होत्या.

(६) जून, १९६८ अखेर फक्त २३% सोसायट्यांनी पूर्ण वेळ काम करणारे सेक्रेटरी नेमले होते.

## मागासप्रमाणे पुढारलेल्या राज्यातही थकबाकी !

थकबाकीचे प्रमाण गेल्या काही वर्षांत फारच वाढत चालले आहे. १९६०–६१ अखेर प्राथमिक पतपेढ्यांकडे ४४·३ कोटी रु. थकबाकी होती, ती १९६५–६६ अखेरे १२५·४ कोटी रु. झाली आणि जून, १९६८ अखेर १७१·० कोटी रु. वर गेली. येणे कर्जाशी थकबाकीचे प्रमाण १९६१ मध्ये २०·३% होते ते १९६६–६७ मध्ये ३३·५% झाले. १९६७–६८ मध्ये हे थोडे कमी होऊन ३२% वर आले. थकबाकी मोठी असणे, हे सर्वच राज्यात आढळून येते; अविकसित किंवा निसर्गाच्या आपत्तीत सापडलेल्या राज्यांतच थकबाकी मोठी असती तर गोष्ट वेगळी. थकबाकीचे प्रमाण पंजाबमध्ये सर्वांत कमी (१९%) आहे. ह्याचा मुद्दाम उल्लेख करायला हवा.

### थकबाकीचे राज्यवार प्रमाण

| राज्य | येणे कर्जाशी थकबाकीचे प्रमाण (%) | |
|---|---|---|
| | १९६५–६६ | १९६७–६८ |
| आंध्र प्रदेश | ३१ | ३३ |
| आसाम | ८९ | ६० |
| बिहार | ३२ | ४१ |
| गुजरात | २३ | २२ |
| हरियाना | | २८ |
| जम्मू-काश्मीर | ६३ | ३५ |
| केरळ | २५ | २७ |
| मध्य प्रदेश | ३३ | ३८ |
| महाराष्ट्र | ३२ | ३७ |
| म्हैसूर | ४२ | ४० |
| नागालँड | | ३७ |
| ओरिसा | २३ | ३८ |
| पंजाब | १८ | १९ |
| राजस्थान | ४७ | ४४ |
| तामीळनाडू | २८ | २८ |
| उत्तर प्रदेश | २५ | २५ |
| पश्चिम बंगाल | ३० | ४१ |
| सबंध भारत | २९ | ३२ |

थकबाकीच्या संबंधात महाराष्ट्राचे सहकारमंत्री ह्यांनी व्यक्त केलेले मत आम्ही खाली देत आहो.

### "आपण मुद्दलातच भांडवल खायला उठलो आहोत"

सहकारी चळवळ वाढत आहे, गाड्या वाढत आहेत, इमारती व्हायला लागल्या आहेत. परंतु, यामध्ये विशेष आश्चर्य काहीच नाही. जगाच्या पाठीवर कुठेच सावकारकी तोट्यात येत नाही. आणि ही सावकारकी कशी? तर सरकारचा पैसा सांगितल्याप्रमाणे वाटून द्यायचा. वसुली नाही. वसुली अधिकारी नेमायचे. त्यातूनही वसुली झाली नाही तर सरकारची शासनयंत्रणा पाठीशी आहेच. अशा तऱ्हेने चालवलेला व्यवहार तोट्यात येणार नाही असे वाटले तरी मुळात भांडवलच आपण खायला उठलो आहोत. आणि आपली जोरात मागणी आहे की, काहीतरी सूट पाहिजे, कर्ज मध्यम मुदतीत करून दिले पाहिजे, कर्जवाढ पाहिजे. किती वाढ कर्जात करून येणार? सहकारी चळवळीत येणारा शेतकरी कर्जमुक्त होणार नसेल तर तिला काय अर्थ आहे? म्हणून ज्याला या चळवळीविषयी निष्ठा वाटते त्याने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. अत्यंत बाक्या परिस्थितीतून महाराष्ट्राची सहकारी चळवळ पुढे गेली आहे. ज्यांनी तत्त्वनिष्ठा दाखविली, पथ्ये पाळली ती पिढी गेलेली आहे, तिचा वारसा तुमच्याकडे आलेला आहे. आज काळाची गरज बदललेली आहे. काही वेगळ्या निष्ठा दाखविण्याची गरज आहे. धोरण बदलण्याची वेळ आलेली आहे. या चळवळीत पैसा आला कोठून? लोकांनी भरलेल्या करांतून हा पैसा निर्माण झाला आहे. तुमच्याशिवाय आणखीही गरजवंत या देशात आहेत. तेव्हा घेतलेला पैसा परत केलाच पाहिजे."

— सहकारमंत्री नामदार यशवंतराव मोहिते.

### एका चित्रपटाची ५७ कोटी रुपये कमाई

१९६५ मध्ये तयार केलेल्या 'दि साउंड ऑफ म्युझिक' ह्या चित्रपटाने आतापर्यंत ५७ कोटी रुपये कमाविले आहेत. कोणत्याही चित्रपटाने एवढे उत्पन्न मिळविलेले नाही. दुसरा क्रमांक १९३९ मधील निर्मितीच्या 'गॉन वुइथ दि विंड' चा आहे; त्याची मिळकत सुमारे ५६ कोटी रुपये. तिसरा क्रमांक १९६८ मध्ये तयार झालेल्या 'दि ग्रॅज्युएट' चा आहे. त्याने ३० कोटी रुपये मिळविले.

### भ्रूणहत्येसाठी दलाली—नवा किफायतशीर धंदा

ग्रेटब्रिटनमध्ये भ्रूणहत्येचा कायदा शिथिल केल्यामुळे दलालांना एक नवीन मिळकत निर्माण झाली आहे. लंडनच्या विमानतळावरील विश्रांतिस्थानात आढळणाऱ्या गर्भवती स्त्रियांना ते खासगी क्लिनिककडे जाण्यास मदत करतात. क्लिनिककडून दलालांना कमिशन मिळते. परदेशातून भ्रूणहत्येसाठी लंडनला येणाऱ्या स्त्रियांची अशी सोय केली जाते. दलालांना मासिक १०,००० रु. प्राप्ती सहज होऊ शकते.

### संस्थानिकांच्या तनखा-बंदीचे अवघड गणित

पार्लमेंटच्या अंदाजपत्रकी अधिवेशनात भूतपूर्व संस्थानिकांचे तनखे आणि खास सवलती रद्द करणारे बिल मांडण्यात येणार आहे. त्याचा तपशील अद्याप तयार होत आहे. संस्थानिकांना द्यावयाच्या नुकसानभरपाईला "नुकसानभरपाई" असे म्हणण्यास सरकार राजकीय कारणासाठी तयार नाही.

राज्यघटनेतील ३६६ व्या कलमात 'रूलर' ची व्याख्या दिली आहे; तो 'रूलर' नाहीसा केल्यावरच तनखे रद्द करावे लागतील. कराबाबत सवलती देणारे २९१ वे कलम दुरुस्त करावे लागेल आणि वैयक्तिक हक्क, सवलती व प्रतिष्ठा ह्यांबाबत संस्थानिकांना आश्वासने देणारे ३६२ वे कलम रद्द करावे लागेल.

स्वातंत्र्यप्राप्तीचे वेळी ५५२ संस्थानिक होते, त्यापैकी २६८ संस्थानिकांनी आपली संस्थाने विलीन करताना जहागिऱ्या पत्करल्या. २८४ संस्थानिकांनी तनखे पत्करले. हैद्राबादच्या निजामाला सर्वात जास्त (५०. लक्ष रुपये) तनखा मिळू लागला. सर्वात कमी तनखा (३,००० रुपये) मिळणारे सात ठाकूर होते. निजामाच्या तनख्यात ५०% कपात झाल्यानंतर आता देण्यात येणारा सर्वात मोठा तनखा (२६.५ लक्ष रुपये) म्हैसूरच्या महाराजास मिळत आहे. सर्वात लहान तनखा (२,४०० रुपये) वरील सात ठाकुरांच्या वारसांना मिळत आहे.

अद्याप तनखा चालू असलेल्या २७९ संस्थानिकांपैकी ९४ संस्थानिकांना ३०,००० रुपयांपेक्षा कमी तनखा आहे. ८६ जणांचा तनखा ३०,००० रुपये ते १ लक्ष रुपये ह्यांच्या दरम्यान आहे आणि ९९ जणांचा तनखा १ लक्ष रुपयांपेक्षा अधिक आहे. एकूण ४.५७ कोटी रुपये तनखा दिला जातो. सरकारने पूर्वी देऊ केलेली नुकसानभरपाई पहिल्या ३० हजारांच्या १२ पट, पुढील ९० हजारांच्या १० पट आणि त्यापुढील रकमेच्या ८ पट अशी होती. म्हणजे, एकूण नुकसानभरपाईची रक्कम ४३ कोटी रुपये होत होती. ही भरपाई २० वर्षांवर वाटली आणि सरकारी रोख्यांवरील व्याजाइतके व्याज द्यावयाचे म्हटले, तर संस्थानिकांना आज जेवढे तनखे दरसाल मिळतात, तेवढेच मिळत राहिल्यासारखे होईल. म्हणजे, तनखे रद्द करण्याच्या घोषणेचा प्रत्यक्ष परिणाम फारसा होणारच नाही. त्यातून सुटका करून घेण्यासाठी ह्या नुकसानभरपाईच्या रकमांवर ठराविक मर्यादेनंतर इन्कम टॅक्स बसवून, त्या द्वारा बरीचशी रक्कम परत घेता येण्याची तरतूद करावी लागेल. परंतु ह्याबाबत अद्याप सरकारचा विचार निश्चित झालेला नाही.

### रेडिओ परवाने

दि. ३१ डिसेंबर, १९६८ पर्यंत ९.२८ कोटी रेडिओ परवाने देण्यात आले व १,२०६ कोटी रु. उत्पन्न मिळाले. १९६८ मध्ये दूरचित्रवाणीचे ७,८०० परवाने देण्यात आले.

# १४ बँकांची राष्ट्रीयीकरणातून मुक्तता
## आणि
# त्यांचे पुनः राष्ट्रीयीकरण

भारतातील १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करणारा कायदा सर्वोच्च न्यायालयाने रद्द ठरविला. बाकीच्या बँकांचे आणि परदेशी बँकांचे राष्ट्रीयीकरण न केल्यामुळे ह्या १४ बँकांच्या बाबतीत कायद्याने भेदभाव केला होता, ही समजूत चुकीची आहे. खरा भेदभाव घडला, तो इतर हिंदी आणि विदेशी बँकांना बँकिंगचा व्यवसाय चालू ठेवण्याची मुभा ठेवल्याने; नव्या बँका काढण्यास बंदी न केल्याने; पण त्याच वेळी राष्ट्रीयीकरण केलेल्या बँकांना मात्र बँकिंगचा व्यवसाय करू न दिल्याने. सर्वसाधारण समजूत आणि निवाड्याचा प्रत्यक्ष अर्थ ह्यात हा सूक्ष्म परंतु महत्वाचा फरक आहे. राष्ट्रीयीकरणासाठी १४ बँका वेगळ्या काढल्या, त्या अप्रस्तुत मुद्यांवर काढल्या, असे वादीचे म्हणणे होते. परंतु कोर्टाने ह्या वर्गीकरणावर मत प्रदर्शित केले नाही. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या कायद्यातील भरपाईची योजना घटनात्मक हमीस धरून नाही, असे कोर्टाने ठरविले. भरपाईविषयी कोर्टाने तपशीलवार हरकती घेतलेल्या आहेत त्या विचारात घेऊनच सरकारला पुढचे पाऊल टाकावे लागले.

कोर्टाच्या निर्णयामुळे मध्यवर्ती सरकारच्या अर्थखात्याला धक्काच बसला. कारण, गेल्या जुलैमध्ये राष्ट्रीयीकरण केलेल्या बँकांवरील त्या खात्याचा अधिकार संपुष्टात आला. अर्थखात्याच्या बँकिंग विभागाचा ह्या बँकांशी असलेला संबंध तुटला आणि त्यांच्याशी . रिझर्व्ह बँकेमार्फत व्यवहार ठेवणे भाग पडले. स्टेट बँक ऑफ इंडिया, इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन, इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट बँक आणि स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स ह्यांचे पुरताच त्याचा अधिकार उरला. संबंध कायदाच रद्द ठरेल, अशी अर्थखात्यात कुणाची कल्पना नव्हती.

विदेशी बँकांचेही राष्ट्रीयीकरण करण्याची ही संधी साधावी असा डाव्या गटाचा आग्रह होता. ह्या १३ विदेशी बँकांची भारतामधील जिंदगी ५५७ कोटी रु. ची आहे. ह्यावरून त्यांना किती भरपाई करावी लागेल, ह्याची कल्पना येईल. ग्रिंडलेज बँक २१२ कोटी रु., चार्टर्ड बँक ७९ कोटी रु., फर्स्ट नॅशनल सिटी बँक ६४ कोटी रु., मर्कंटाइल बँक ४९ कोटी रु., अमेरिकन एक्सप्रेस ३३ कोटी रु., बँक ऑफ अमेरिका ३० कोटी रु., असे काही विदेशी बँकांच्या जिंदगीचे आकडे आहेत.

कोर्टाच्या निर्णयामुळे १८ जुलै १९६९ रोजी जी परिस्थिती होती, ती पुनः निर्माण झाली आणि ह्या १४ बँकांचे कस्टोडिअन पुनः चेअरमन बनले. बँकांची संचालक मंडळे पुनः अस्तित्वात आली. त्यांच्या संचालक मंडळाच्या सभास उपस्थित राहण्यासाठी रिझर्व्ह बँकेने आपले अधिकारी नियुक्त केले. रिझर्व्ह बँकेने ह्याबाबत ह्या बँकांकडे सर्क्युलर पाठविले, ते चेअरमनना उद्देशून; पूर्वीच्या कस्टोडिअन्सना नव्हे.

ह्या सर्क्युलरमध्ये २१ जानेवारीच्या आदेशांचा पुनरुच्चार करण्यात आला. ( मोठ्या कर्जास आणि गुंतवणुकीस रिझर्व्ह बँकेची पूर्व-अनुमती घेण्याविषयीचे हे आदेश आहेत. ) रिझर्व्ह बँक लहान बँकांच्या संचालक मंडळावरही आपले प्रतिनिधी नियुक्त करणार होती. सबंध बँकिंग क्षेत्रावर आपले नियंत्रण पक्के करण्याचा उद्देश त्यामागे होता. १९ जुलै, १९६९ पासून १० फेब्रुवारीपर्यंत राष्ट्रीयीकरण केलेल्या प्रत्येक बँकेत एक इंटर्नल मॅनेजमेंट कमिटी असे. त्यात कस्टोडिअन आणि बँकेचे काही वरिष्ठ अधिकारी असत. कमिटीचे काम केवळ कारभारविषयक होते; कस्टोडिअनला सहाय्यकारक असे ते होते. ह्या कमिटीवर रिझर्व्ह बँकेचा एक अधिकारी असावयाचा.

१४ बँकांचे पुनः राष्ट्रीयीकरण करणारा वटहुकुम राष्ट्रपतींनी शनिवार, दि. १४ रोजी काढला आहे. ह्या बँकांचे १९ जुलै, १९६९ पासूनच राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे, असे वटहुकुमाने जाहीर केले आहे. ह्याचा अर्थ, पूर्वी राष्ट्रीयीकरण न केलेल्या हिंदी व विदेशी बँका ह्या पूर्वीप्रमाणेच खासगी क्षेत्रात राहिल्या आहेत. बँकिंग कंपन्यांना मिळावयाची भरपाई मात्र ८७.४ कोटी रु. करण्यात आली आहे; रद्द केलेल्या कायद्यात ती ७१ कोटी रु. होती. लाइफ इं. कॉर्पोरेशन आणि युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया ह्यांचेकडे मिळून १४ बँकांच्या एकूण भागांपैकी ३०% भाग आहेत. त्या मानाने भरपाईचा बोजा कमी होईल. वटहुकुमाप्रमाणे, ह्या १४ बँकांना कोणताहि धंदा करण्यास मुभा राहील. बँकिंग रेग्युलेशन ॲक्टातील तरतुदी त्यांना पाळता आल्या, तर त्या बँकिंगचा व्यवसायहि करू शकतील. परंतु हा केवळ श्लेष काढण्याचा प्रकार आहे; व्यावहारिक वाटत नाही. तथापि, ह्या कंपन्यांना मिळणाऱ्या ८७ कोटी रुपयांचा उपयोग उद्योगधंदे काढण्याकडे आणि वाढविण्याकडे त्या करू शकतील. ( पुणे इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीचे राष्ट्रीयीकरण केल्यानंतरही ती कंपनी कायम राहून स्वतंत्र व्यवसाय करीत आहे, हा दाखला येथे देता येईल. ) हा निर्णय भागधारकांनी घ्यावयाचा आहे. त्यांना कंपनी लिक्विडेशनमध्ये नेऊन भरपाईची रक्कम वाटून घेता येईल अथवा त्या रकमेचा वापर कसा करावा हे ठरविता येईल.

भरपाईची रक्कम ठरविताना वसूल भांडवल आणि गंगाजळी ह्याप्रमाणे प्रत्येक बँकेची नफा मिळविण्याची सिद्ध पात्रताही विचारात घेतलेली आहे. त्यामुळे, भागधारकांना जेवढे डिव्हिडंड मिळत होते, त्याची भरपाई व्हावी अशी योजना आहे. प्रत्येक बँकेचे काही गुप्त रिझर्व्ह असतात, त्यांचा विचारही शक्य तेवढा केलेला आहे.

आता सरकार शक्य तितक्या लवकर रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याने प्रत्येक बँकेसाठी पहिले संचालक मंडळ नेमील. त्यात जास्तीत

ज्यास्त सात जण असतील. राष्ट्रीयीकरण केलेल्या सर्व बँकांची पुनर्रचना करून नवे संचालक मंडळ नेमण्यात येईल, तोपर्यंत हे मंडळ राहील. पहिल्या मंडळात बँकेचे कर्मचारी आणि ठेवीदार ह्यांचे प्रतिनिधी, त्याचप्रमाणे शेतकरी, कामगार आणि कारागीर ह्यांचे हितरक्षण करणारेही असतील

भरपाईची रक्कम प्रत्येक कंपनी मागेल त्याप्रमाणे दिली जाईल–रोखीने, रोख्यांचे स्वरूपात किंवा कोणत्याही प्रमाणात, दोन्हीमध्ये.

**भरपाईच्या रकमा**

| बँक | कोटी रु. |
|---|---|
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया | १७·५० |
| बँक ऑफ इंडिया | १४·७० |
| पंजाब नॅशनल बँक | १०·२० |
| युनायटेड कमर्शिअल बँक | ८·३० |
| कॅनरा बँक | ३·६० |
| युनायटेड बँक ऑफ इंडिया | ४·२० |
| देना बँक | ३·६० |
| सिंडिकेट बँक | ३·६० |
| युनियन बँक ऑफ इंडिया | ३·१० |
| अलाहाबाद बँक | ३·१० |
| इंडियन बँक | २·३० |
| इंडियन ओव्हरसीज बँक | २·५० |
| बँक ऑफ महाराष्ट्र | २·३० |

## श्री. जगजीवनराम ह्यांचे राजकीय क्षेत्रातील महत्त्वपूर्ण स्थान

('टाइम' साप्ताहिकावरून)

काँग्रेसचे अध्यक्ष, अन्न व शेती मंत्री आणि इंदिरा गांधींचे प्रमुख सहकारी जगजीवनराम हे भारतातील अत्यंत सामर्थ्यवान राजकीय पुढाऱ्यांपैकी एक आहेत. ते बनारस हिंदू विद्यापीठाचे सायन्स शाखेचे पदवीधर आहेत. गांधींच्या ब्रिटिश-विरोधी काँग्रेसला ते येऊन मिळाले आणि १९४० मध्ये त्यांनी कारावास भोगला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४७ मध्ये ते मजूरखात्याचे मंत्री झाले, ते २८ महिन्यांचा खंड सोडता, सतत मंत्रिमंडळात आहेत. एका महिन्याला त्यांना कॉलेजात राहण्याचा आणि जेवणाचा खर्च येई, तेवढा त्यांना दर आठवड्याला स्टेट एक्सप्रेस सिगारेट्ससाठी आता येतो. ते मद्य घेत नाहीत. त्यांना ब्रिज खेळायला आवडते. मंत्रिमंडळातील कामगिरीपेक्षा काँग्रेस पक्षाचे हरिजन पुढारी म्हणून त्यांस विशेष महत्त्व आहे. पंतप्रधान लालबहादुर शास्त्री ह्यांच्या मृत्यूनंतर जगजीवनरामांच्या ५० हरिजन मतदार गटामुळेच इंदिरा गांधींची पंतप्रधान म्हणून निवडणूक होऊ शकली. जगजीवनराम ह्यांना स्वतःला पंतप्रधान होण्याचा मोका बहुधा कधीच येणार नाही, पण इंदिरा गांधी पंतप्रधानकी-वरून खाली उतरल्या तर जगजीवनराम हेच पुढील पंतप्रधानांना स्थानापन्न करू शकतील.

---

# तातडीने पुनः वटहुकूम काढण्याजोगी जरुरीची परिस्थिती होती काय?

### राष्ट्रपतीचे कायदेविषयक अधिकार

कलम १२३

*(१) पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांची बैठक चालू नसताना जर कोणत्याही वेळी राष्ट्रपतीला असे वाटले की, विद्यमान परिस्थितीमुळे तातडीचे उपाय योजणे आवश्यक आहे, तर त्याने परिस्थितीच्या जरूरीप्रमाणे योग्य ते वटहुकूम काढावेत.*

*(२) या कलमान्वये काढलेले वटहुकूम पार्लमेंटच्या कायद्याइतकेच प्रभावी व परिणामकारक असतील. पण प्रत्येक वटहुकूम*

*(अ) पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवला जाईल आणि तो पार्लमेंटची बैठक भरल्यापासून सहा आठवडे संपताच रद्द होईल, किंवा हे सहा आठवडे पुरे होण्यापूर्वीच, जर ह्या वटहुकुमाच्या नापसंतीचा ठराव दोन्ही सभागृहांनी केला, तर तो दुसरा ठराव पास होताच रद्द होईल आणि*

*(ब) राष्ट्रपतीकडून तो केव्हाही परत घेतला जाईल.*

राष्ट्रपतींचा वटहुकुमाचेसंबंधी अधिकार वर दिला आहे. त्या अधिकाराचा असा अर्थ नव्हे, की पार्लमेंट चालू नसेल त्यावेळी राष्ट्रपतीला कायदेविषयक सर्वाधिकार प्राप्त होतो. तातडीचे उपाय योजण्यास आवश्यक अशी परिस्थिती असायला हवी. बँक नॅशनलायझेशन ॲक्ट सुप्रीम कोर्टाने रद्द केला, एवढ्याने केवळ तातडीच्या उपाययोजनेची परिस्थिती निर्माण झाली, असे म्हणता येईल काय? पार्लमेंटची बैठक लवकरच भरावयाची असताना असा वटहुकूम काढणे कितपत योग्य ठरेल? पूर्वीच्या वटहुकुमाचे बाबतीत हा मुद्दा सुप्रीम कोर्टात उपस्थित करण्यात आला होता, परंतु सुप्रीम कोर्टाने बुद्ध्याच निर्णय केला नाही. पूर्वीच्या वटहुकुमाच्या कायदेशीरपणावर सुप्रीम कोर्टाला मत व्यक्त करण्यास संधीच मिळू नये, ह्यासाठीच सरकारने घाईगर्दीने राष्ट्रीयीकरणाचे बिल पास करून घेतले आणि त्यामुळे वटहुकूम आपोआपच रद्द झाला. पुनः वटहुकूम काढल्याने हा अनिर्णित प्रश्न पुनः सुप्रीम कोर्टाकडे येण्याची शक्यता आहे.

राष्ट्रीयीकरण केलेल्या बँका पुनः पूर्वस्थितीत आल्या, तरी त्यांच्या कारभारामुळे राष्ट्रीय अर्थकारणाला अपाय होऊ नये ह्याची व्यवस्था करण्याचे रिझर्व्ह बँकेला भरपूर अधिकार आहेत. सरकारची प्रतिष्ठा राखण्यासाठी वटहुकुमाची तातडीची उपाययोजना हवी होती हे खरे असले तरी ते कारण कायदेशीर ठरेल काय? वटहुकुमाचे विरुद्ध सुप्रीम कोर्टाकडे अर्ज करण्यात आला आणि सुप्रीम कोर्टाने वटहुकुमाची कारवाई स्थगित केली, तर आताच्या पेक्षाही पत कमी होईल. हा फार मोठा धोका सरकारने पत्करला आहे.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

### १९६९ च्या डिव्हिडंडमध्ये वाढ

सातारा येथील युनायटेड वेस्टर्न बँकेने सन १९६९ मध्ये विशेष समाधानकारक प्रगती केली असून डिव्हिडंडमध्ये अर्धा टक्का वाढ करून तो साडेनऊ टक्क्यांप्रमाणे द्यावयाचे ठरविले आहे. बँकेच्या नफ्यात गेल्या वर्षापेक्षा २४ टक्क्यांनी वाढ होऊन तो रु. ३·५५ लाख झालेला आहे.

सन १९६९ मध्ये बँकेने सर्वच क्षेत्रांत स्पृहणीय अशी प्रगती केलेली आहे. बँकेच्या ठेवीत रु. २·५५ कोटींची वाढ होऊन त्या सालअखेर रु. ११·९४ कोटी इतक्या झालेल्या आहेत. वाढीचे हे प्रमाण २७ टक्के आहे. सर्व बँकांचे मिळून जे ठेव-वाढीचे प्रमाण आहे, त्यापेक्षा हे बरेच जास्त आहे. बँकेच्या कर्ज-व्यवहारातही भरघोस म्हणजे ३८ टक्क्यांहून अधिक वाढ झालेली असून तो वर्षअखेर रु. ७·९३ कोटींच्यावर गेलेला आहे. वर्षअखेर बँकेचे वसूलभांडवल रु. १३·१० लाख असून एकूण गंगाजळी रु. ११ लाख आहे. नोकरांना बँकेने या वर्षी जादा एक टक्का म्हणजे एकूण सात टक्के बोनस जाहीर केलेला आहे.

१९६९ मध्ये बँकेने रावेर (जिल्हा-जळगाव), सांगली, भडगाव (जिल्हा-जळगाव), होळ (सासरवाडी), टिळक-रोड (पुणे); टेंभुर्णी, विलेपार्ले (मुंबई) व अहमदनगर येथे अशा ८ नवीन शाखा उघडल्या असून बँकेच्या आता एकूण ४३ शाखा झालेल्या आहेत. चालू सालीही बँकेने तळेगाव (ढमढेरे), ठाणे, वगैरे ठिकाणी नवीन शाखा उघडण्याचा निश्चित असा कार्यक्रम आखलेला आहे.

सन १९६९ मध्ये बँकेने केलेली ही नेत्रदीपक प्रगती पाहून सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे.

### आधुनिक समाजातील कुटुंबाचे स्थान

जंगलात राहणाऱ्या प्राण्यांच्या वर्तणुकीचा अभ्यास करणाऱ्या एका शास्त्रज्ञाच्या मताने मानवी समाज टिकून राहावयाचा असेल तर मोठ्या आणि स्थैर्य पावलेल्या कुटुंबांची अगर कुटुंबसमूहांची फार आवश्यकता आहे. अलीकडे सर्व जगभर मोठ्या शहरांतून लहान-मोठ्या गाळ्यांतून राहणाऱ्या कुटुंबांची संख्या वाढत आहे. अशा कुटुंबांतून बहुधा आईबाप आणि त्यांची अपत्ये एवढ्यांचाच समावेश असतो. पण, त्यामुळे कुटुंबातील लहान मुलांना आईबापांशिवाय इतरांचा चांगला परिचय होत नाही. अर्थात नव्या माणसांची गाठ पडली की ती बुजतात, काहीशी अस्वस्थ होतात आणि कधीकधी भीतिग्रस्तही होतात. म्हणून कुटुंबात वयस्कर आजी-आजोबांची गरज आजही आहे, असा अभिप्राय ह्या शास्त्रज्ञाने व्यक्त केला आहे. ते पुढे म्हणतात की, ह्याचा अर्थ खूप मुले असलेली कुटुंबे असावीत असा मात्र नाही. प्रत्येक मुलाला आईबापांखेरीज शेजारच्या इतर कुटुंबांतील वडीलधाऱ्या माणसांचाही परिचय व्हावयास पाहिजे. असा परिचय झाल्यास मुलांना अधिक सुरक्षित वाटते. म्हणून अनेक तरुण कुटुंबांनी गट बनवावे आणि एकमेकांच्या अडीअडचणींना उपयोगी पडावे. असे केले तर मुलांच्या मनात आपण एका मोठ्या संघटनेत वावरत आहो असे वाटते आणि त्यांच्यात सुरक्षितपणाची भावना जोपासली जाते. उलट, छोट्या कुटुंबांतून वाढलेली मुले जगात वावरू लागली की त्यांच्यात एक प्रकारची भीतीची भावना घर करून राहिलेली दिसते.

### अमेरिकेला अधिक निर्यात करणे शक्य

तज्ज्ञांनी केलेल्या एका पाहणीप्रमाणे भारत अमेरिकेला सध्यापेक्षा अधिक प्रमाणात निर्यात करू शकेल. त्यांच्या अंदाजाप्रमाणे १९७४ च्या सुमारास निर्यातीत वाढ करून भारत अमेरिकेकडून ५० कोटी डॉलर्स अथवा ३७५ कोटी रुपयांचे अधिक परदेशीय चलन मिळवू शकेल; मात्र त्यासाठी भारताला आपले निर्यातीचे प्रयत्न अधिक संघटितरीत्या करावे लागतील आणि अमेरिकेतील भारताचे व्यापारी प्रतिनिधित्व अधिक परिणामकारक करावे लागेल.

## श्री. द. दि. ऊर्फ मामासाहेब चितळे ह्यांचे दुःखद निधन

सहकारी बँकिंगचे एक महर्षी, श्री. दत्तात्रय दिवाकर ऊर्फ मामासाहेब चितळे हे दि. १६ फेब्रुवारी, १९७० रोजी मेंदूतील रक्तस्रावामुळे वयाच्या ७६ व्या वर्षी मृत्यू पावले, हे नमूद करण्यास अत्यंत दुःख होते. त्यांचा जन्म १० डिसेंबर, १८९४ रोजी मेढे (ता. जावळी, जि. सातारा) येथे झाला. १९१३ साली न्यू इंग्लिश स्कूल, पुणे, ह्या शाळेतून ते मॅट्रिक पास झाले. घरच्या परिस्थितीमुळे त्यांना उच्च शिक्षणास मुकावे लागले आणि नाखुषीने सरकारी नोकरी पतकरावी लागली. ऑगस्ट, १९२५ मध्ये त्यांनी ह्या नोकरीचा राजीनामा दिला व पुणे सें. को. बँक लि. मध्ये दरमहा रु. ४० वर आपल्या कामी ते रुजू झाले. त्या वेळी बँकेतील नोकरांना प्राव्हिडंट फंडही मिळत नव्हता. श्री. मामासाहेबांनी स्वार्थत्यागपूर्वकच ह्या क्षेत्रात प्रवेश केला. हीच त्यांची खरी कर्मभूमी ठरली. १ ऑगस्ट, १९२५ पासून ९ डिसेंबर, १९४९ अखेर त्यांनी बँकेत वेगवेगळ्या हुद्द्यांची कामे केली. १९३२ ते १९४९ त्यांनी मॅनेजिंग डायरेक्टर ह्या नात्याने बँकेची बहुमोल सेवा केली. १० डिसेंबर, १९४९ ते ३१ मार्च, १९५१ अखेर ते डायरेक्टर बोर्डाचे नियुक्त सल्लागार होते. श्री. मामासाहेबांनी अनेक प्रकारच्या सहकारी संस्था काढण्यात पुढाकार घेतला व त्यांचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मृत्यूमुळे सहकारी क्षेत्रातील एक सच्चा, निष्ठावंत, तज्ज्ञ कार्यकर्ता आणि मार्गदर्शक नाहीसा झाला आहे. त्यांची जागा भरून निघणे अशक्य आहे. "अर्था"चे ते तज्ज्ञ सहकारी लेखक होते, हे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे आवश्यक आहे.

## रशिआ-पश्चिम जर्मनी ह्यांच्यातील सौदा

नॅटो ह्या पश्चिम युरोपीय देशांच्या लष्करी संघटनेचा रोख सदैव आपणाकडे असतो असा आरोप रशिआ नेहमीच करीत असतो. त्यातही पश्चिम जर्मनीला पुढे करून अमेरिका रशिआ-विरोधी आक्रमण करण्यास टपलेली आहे असा जगाचा ग्रह करून देण्याची त्याची खटपट असते. पण, आर्थिक व्यवहार सोईचा असला तर त्यानुसार सौदा करण्यास मात्र तो मागेपुढे पाहात नाही. अलीकडेच पश्चिम जर्मनी आणि रशिआ ह्यांच्यांत परस्परांचे आर्थिक हित साधणारा एक सौदा करण्यात आला आहे. पश्चिम युरोपातील कोणत्याही देशाशी केलेल्या कोणत्याही सौद्यापेक्षा तो मोठा आहे. रशिआमध्ये एक मोठा मोटारींचा कारखाना, बांधण्याचा करार इटलीशी करण्यात आला आहे. पण ह्या करारापेक्षाही नव्या सौद्याचे स्वरूप भव्य आहे. जर्मनीतील पोलाद कारखान्यांनी रशिआला मोठ्या आकाराचे पोलादी नळ पुरवावयाचे आहेत. त्यांचे वजन सुमारे १२ लाख टनांइतके होईल. रशिआला हे नळ घेणे शक्य व्हावे म्हणून पश्चिम जर्मनीतील अनेक बँका २७० कोटी मार्क्सच्या किंमतीचे कर्जही पुरविण्यास तयार झाल्या आहेत. ह्या कर्जावर ६ टक्के व्याज आकारण्यात येणार आहे. ह्या कर्जाची परतफेड रशिआ पश्चिम जर्मनीला सायबेरिआतील नैसर्गिक जळाऊ गॅस पुरवून करणार आहे. हा पुरवठा करण्यासाठी सायबेरिआतील नैसर्गिक वायूच्या उत्पादन स्थानापासून थेट बव्हेरिआच्या सीमेपर्यंत नळ टाकण्यात येणार आहेत. रशिआचे राजकारण त्याच्या आर्थिक हित-संबंधाशी निगडीत असल्याचा हा पुरावाच आहे.

## 'फॅशन शो' साठी सदिच्छा मंडळाचा दौरा

'फेमिना' पाक्षिकाने कॉटन टेक्स्टाइल्स् एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल, सेंट्रल सिल्क बोर्ड आणि पी. अँड ओ. शिपिंग समूह ह्यांच्या सहकार्याने ऑस्ट्रेलिया आणि आग्नेय आशिया ह्यांकडे एका फॅशन-सदिच्छा मंडळाचा दौरा आखला आहे. मंडळाचे नेतृत्व 'फेमिना'चे संपादक श्री. झंजिआनी ह्यांचेकडे असून मंडळात तीन अग्रेसर हिंदी मॉडेल्सचा समावेश आहे. निर्गत वाढीच्या प्रचारांतील हा दौरा हा एक उपक्रम आहे. 'चुसान' आगबोटीवर, त्याचप्रमाणे मेलबर्न, कॅनबेरा, सिडने, ब्रिसबेन, हाँगकाँग, सिंगापूर आणि कोलंबो येथे फॅशन शो केले जातील. ९ फेब्रुवारी रोजी मंडळाने भारत सोडले.

## खासगी हॉटेलांना सरकारची कर्जे

भारत सरकारने ८ खासगी हॉटेलांना २·५ कोटी रु. ची कर्जे मंजूर केली आहेत. त्यातील ४ मुंबईत, ३ कलकत्त्यात आणि १ हैद्राबाद येथील आहेत. कर्जामुळे हॉटेलांतील खोल्यांच्या संख्येत ८६० ची भर पडून आणखी १,५८४ उतारूंची राहण्याची सोय होईल.

## हिंन्दी सिगारेट्सची निर्गत रोडावली

भारतीय सिगारेट्सच्या निर्गतीत गेल्या काही वर्षांत खूप घट झाली असून विड्यांसाठी मागणीही कमी झाली आहे. १९६६-६७ मध्ये भारताने ४९ लक्ष रु. ची सिगारेट्सची निर्गत केली; १९६७-६८ मधील निर्गत २४ लक्ष रु. वर आली. १९६८-६९ मधील निर्गत फक्त ३·२ लक्ष रु. ची भरली. एप्रिल-जून १९६९ च्या ताज्या आकड्यांप्रमाणे, ह्या तीन महिन्यांत फक्त २९,००० रुपयांच्या सिगारेट्स परदेशी गेल्या. भारतातून दरसाल सुमारे २० लक्ष रुपयांच्या विड्यांची निर्गत होते.

## ला. इं. कॉर्पोरेशनचे नवे चेअरमन

सिंडिकेट बँकेचे कस्टोडिअन; श्री. टी. ए. पै ह्यांची लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या चेअरमनचे जागी नेमणूक करण्यात आली आहे. ला. इं. कॉर्पोरेशनचे पैसे गुंतवण्याच्या बाबतीत श्री. पै ह्यांच्या काही नावीन्यपूर्ण कल्पना आहेत, त्यांना वाव देण्याचा ह्या नेमणुकीमागे हेतू आहे.

## द्राक्षांच्या नव्या जातींची निर्मिती

प्रोफेसर डॉ. गणेश सिंग चीमा, प्रोफेसर एन. ए. फडणीस आणि श्री. व्ही. के. शिंदे ह्यांनी प्रयोगांती द्राक्षाच्या १४ नव्या जाती निर्माण केल्या आहेत. त्यांपैकी दोन जाती अनावेशाही आणि चीमासाहेब (सिलेक्शन सेव्हन) ह्यापेक्षाही सरस ठरण्याचा संभव आहे.

## बँक ऑफ बरोडा

बँक ऑफ बरोडाने गेल्या वर्षी १०० नव्या शाखा उघडल्या, त्यामुळे एकूण शाखांची संख्या ४३३ झाली. बँकेकडील ठेवी ३१४ कोटी रु. वरून ३५४ कोटी रु. वर गेल्या. बँकेच्या कर्जपुरवठ्याचा आकडा ४० कोटी रु. नी वाढून २३५ कोटी रु. झाला.

## नैजेरियातून कॅथॉलिक मिशनऱ्यांची हकालपट्टी

नैजेरियातील अंतर्गत यादवीचे काळात फुटून गेलेल्या बायफ्रामध्ये काम करीत असलेल्या २१ रोमन कॅथॉलिक मिशनऱ्यांना नैजेरियातून हद्दपार करण्यात आले आहे. ते जिनीव्हाला गेले. आणखी ११ मिशनऱ्यांनी आपले चंबूगबाळे बांधून लंडनकडे कूच केले.

## किर्लोस्कर, मुळगावकरांचा सन्मान

इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) चे ऑनररी लाइफ मेंबर म्हणून श्री शंतनुराव किर्लोस्कर आणि श्री. एस. मुळगावकर ह्यांची नियुक्ती झाली आहे. इस्टिटयूशनच्या सुवर्णमहोत्सवप्रसंगी त्यांची मानचिन्हे पंतप्रधानांनी त्यांना दिली. श्री शंतनुराव किर्लोस्कर हे फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे भूतपूर्व अध्यक्ष असून श्री. मुळगावकर हे टाटा इंडस्ट्रीजचे व्हाइस चेअरमन आहेत.

### शास्त्रीय ज्ञानाची तारक आणि मारक शक्ती

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालात शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीची झेप एकदम झेपावली. त्याचबरोबर त्या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करून घेण्याचे तंत्रज्ञानही तितक्याच वेगाने फोफावले. ह्या शास्त्रीय प्रगतीचा उपयोग कशासाठी करून घ्यावयाचा ह्याचा निर्णय मात्र मनुष्य जातीला अद्याप करता आलेला नाही. परिणामी शास्त्रीय व तांत्रिक प्रगती मनुष्य-जातीच्या तारणासाठी जशी वापरता येईल त्याचप्रमाणे तिचा घातक उपयोगही होण्याची शक्यता आहे. भारताच्या संरक्षण खात्याचे माजी शास्त्रीय सल्लागार डॉ. एस. भगवंतम् ह्यांनी तिरुपती येथे वेंकटेश्वर विद्यापीठाच्या १३ व्या पदवीदान समारंभात बोलताना ही शक्यता स्पष्टपणे व्यक्त केली आहे. ते आपल्या भाषणात म्हणाले की आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा व तांत्रिक कौशल्याचा उपयोग करून जगातील उपासमार नाहीशी करता येणे अवघड नाही. पण, ह्या ज्ञानाचा विधायक उपयोग करण्यात आला तरच हे शक्य होईल. उलटपक्षी, विघातक कामासाठी उपयोग करण्याच्या प्रवृत्तीतून प्रचंड विध्वंस करणारे अणुबाँबच उत्पन्न होत आहेत. जंतुशास्त्रातील विध्वंसक ज्ञान तर ह्याहीपेक्षा भयंकर म्हणावे लागेल. एखाद्या शहराच्या ५० लाख लिटर पाणीपुरवठ्यात अर्धा किलोग्रॅम जोपासलेले खास जंतू टाकण्यात आले तर आजार, मरण आणि अपंगत्व ह्यांचा हाहाःकार उडून जाईल. अशा पाण्याचे ३ औंस प्राशन झाले तर ते घातक ठरेल. इतकाच हाहाकार पोटॅशिअम सायनाइड ह्या विषाने साधावयाचा झाल्यास १० टन विषद्रव्य लागेल. ह्यावरून जंतूंच्या साह्याने युद्ध करण्याचा प्रकार किती भयंकर आहे हे स्पष्ट होते.

---

### परदेशी जाणाऱ्या डॉक्टरांच्या बाँडच्या रकमेत वाढ

वैद्यकीय शिक्षणातील खास शाखांत पारंगत होण्यासाठी भारतामधील काही डॉक्टर्स परदेशी जातात. त्यांना कधीकधी परदेशांकडून आर्थिक मदतही मिळते. परदेशांत गेलेले अनेक डॉक्टर्स तेथील भरभराटीच्या मोहाने तेथेच राहतात; आणि मोठा खर्च करून तयार झालेल्या ह्या डॉक्टरांचा भारताला उपयोग होत नाही. ह्यावर एक उपाय म्हणून भारत सरकारच्या आरोग्य खात्याने परदेशी शिक्षणासाठी अगर संशोधनासाठी जाणाऱ्या डॉक्टर्सकडून घेण्यात येणाऱ्या बाँडची रक्कम ५० हजारापर्यंत वाढविली आहे. ह्यापूर्वी २० हजार रुपयांचा बाँड त्यांना द्यावा लागत असे. भारतात डॉक्टर्स पुरेसे नसताना त्यांच्या शिक्षणाचा लाभ परदेशांतील लोकांना मिळावा ही गोष्ट गैर मानली जाते. इंग्लंड आणि अमेरिकेतील वैद्यक व्यवसायात कितीतरी हिंदी डॉक्टर्स आज काम करीत आहेत. त्यांची संख्या सुमारे ८ हजार असावी असा अंदाज आहे. हिंदी डॉक्टर्सच्या कौशल्याचा लाभ हिंदी लोकांनाच व्हावा या हेतूने भारत सरकारच्या आरोग्यखात्याने काही दिवसांपूर्वी असे सुचविले होते की ह्यापुढे परदेशी जाण्यासाठी डॉक्टर्सना पासपोर्टच देण्यात येऊ नये. परंतु इतक्या कडक उपायाला परराष्ट्रीय खात्याने आक्षेप घेतला. अशा तऱ्हेची सरसकट बंदी घातली गेली असती तर अनेक हुशार डॉक्टर्सना परदेशांतील अद्ययावत ज्ञान मिळ-विण्याची संधीच मिळाली नसती. वैद्यकीय व्यवसायात अजूनही काही उच्च दर्जाचे शिक्षण परदेशातच मिळणे शक्य आहे. अशा परिस्थितीत पासपोर्ट न देण्याचे सरसकट धोरण अयोग्यच म्हणावे लागले असते.

---

### प्राप्तिकराच्या बिलाने हृद्रोगांचे झटके

मुंबईमधील प्रख्यात हृद्रोग तज्ज्ञ डॉ. रस्तुम जाल वकील ह्यांना ह्या रोगाच्या अभ्यासाच्या कामी विशेष कामगिरी केल्याबद्दल डॉ. बी. सी. रॉय पारितोषिक देण्यात आले. ह्या प्रसंगी त्यांनी अशी माहिती सांगितली की त्यांच्या तीन रोग्यांना प्राप्तिकराची बिले आल्यावर प्राणघातक झटके आले. प्राप्तिकराच्या आकारणी बिलामुळे त्यांच्या मनावर विलक्षण ताण पडला आणि तो त्यांना असह्य झाला. हृदयविकाराच्या इतर कारणांत वाजवीपेक्षा अधिक लठ्ठपणा, अतिशय धूम्रपान, बेसुमार मद्यपान, मानसिक ताण, ह्यांचा त्यांनी निर्देश केला. त्याशिवाय आहारात प्रमाणाबाहेर चरबीयुक्त पदार्थ असण्यामुळेही हा रोग होऊ शकतो असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला.

---

### अरब–इस्राइल लढ्यात पाकिस्तानी सैन्य

पश्चिम आशिआतील अरब-इस्राइल संघर्षात अरब देशांना मदत करण्यासाठी पाकिस्तानने आपले एक रेजिमेंट म्हणजे सुमारे २ हजार ते ३ हजार सैनिक पाठविले आहेत. ह्या सैनिकांचा मुक्काम जॉर्डन ह्या देशात आहे. भारताबरोबर काश्मीरच्या प्रश्नावर चाललेल्या तंट्यात अरब देशांचा पाठिंबा मिळविण्यासाठी पाकिस्तानने हे पाऊल उचलले असावे असा राजकीय निरीक्षकांचा कयास आहे. शिवाय जगातील इस्लामी देशांची एक संघटना उभारण्याचा प्रयत्न पुन्हा सुरू करण्याचा उद्देशही त्यामागे असावा. जॉर्डनमध्ये पाकिस्तानने दोन छोट्या लष्करी तुकड्या सुमारे तीन–चार महिन्यांपूर्वीच पाठविल्या आहेत. त्यांपैकी एक तुकडी जॉर्डनच्या विमानदलात आणि दुसरी चिलखती दलात शिक्षण घेत आहे. दोन्ही तुकड्यांत मिळून २०० ते ३०० सैनिक आहेत.

---

### पुणे म्यु. कॉ. सर्व्हंट्स बँकेचा स्वतःच्या नव्या इमारतीत ५७ वा वर्धापनदिन

पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हंट्स को. अर्बन बँक लि. चा ५७ वा वर्धापन दिन शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी १९७० रोजी म्युनिसिपल कमिशनर श्री. के. कृ. मोघे, आय. ए. एस. यांच्या हस्ते बँकेच्या नव्या इमारतीत साजरा झाला. त्यानिमित्त बँकेचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक ह्यांना पानसुपारीसाठी निमंत्रिले होते.

---

## बँकिंग आणि विकास ह्यावरील परिसंवाद

मुंबई येथे रिझर्व्ह बँकेच्या विद्यमाने बँकिंग आणि विकास ह्या विषयासंबंधी एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद भरविण्यात आला होता. त्यासाठी १६ देशांचे प्रतिनिधी आले होते. अविकसित देशांतल्या प्रतिनिधींबरोबरच काही प्रगत देशांचे प्रतिनिधीही हजर होते. परिसंवादाचे उद्‌घाटन करताना रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एल. के. झा म्हणाले की आर्थिक विकासाच्या मार्गावर पावले टाकणाऱ्या कोणत्याही अविकसित देशात आर्थिक स्थैर्यावर फार जोर देण्यात आला तर प्रगती रोखली जाण्याचा संभव असतो. अशा परिस्थितीत देशातील मध्यवर्ती बँकिंगच्या संस्थेपुढे एक प्रकारची शृंगापत्ती उभी राहते. ह्या संस्थेला आर्थिक विकास आणि स्थैर्य ह्या दोन्ही बाबींकडे लक्ष सारखेच द्यावयाचे असते आणि पुष्कळदा अशी परिस्थिती उत्पन्न होते की ह्या बाबी परस्पर विरोधी असतात. मध्यवर्ती बँकिंग संस्था आपले कार्य करण्यासाठी जे उपाय वापरतात तेही त्रिकालबाधित असत नाहीत. प्रगत देशांतील संस्था जे उपाय उपयोगात आणतात ते अविकासित देशात नीटसे फलद्रूप होत नाहीत असा अनुभव आहे. भारताने विकासाच्या कामी अनेक देशांतील अनुभवाचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला आहे. रिझर्व्ह बँक ही संघटना ब्रिटनमधील नमुन्याप्रमाणे उभारली गेली आहे. कॅनडातील धर्तीवर औद्योगिक विकास बँकेची स्थापना करण्यात आली आहे आणि पतीवरील कर्जपुरवठ्याच्या नियोजनाच्या बाबतीत फ्रान्सचे अनुकरण केलेले आहे. विकासाच्या बाबतीत जपानी बँकांचा अनुभवही लक्षात घेण्यासारखा आहे.

---

## कपास कापडाच्या गिरण्यात वाढ नको


कापडगिरण्यांच्या वाढीवरील सरकारी बंदी कायम राहाणार आहे. सध्याच्या चात्यांची संख्या पुरेशी आहे. त्यामुळे नव्या गिरणीला परवानगी मिळण्याचा संभव नाही.

१९७३–७४ मध्ये भारताला ९३५ कोटी मीटर कापड लागेल ( ८० कोटी मीटरची निर्गत धरून ). त्याकरिता १०७ कोटी किलोग्रॅम सूत लागेल. इतर प्रकारच्या कापडासाठी आणखी ७ कोटी किलोग्रॅम सूत लागेल. सध्या १७५·५ लक्ष चात्या बसविलेल्या आहे आणि त्या ११६ कोटी किलोग्रॅम सूत देऊ शकतील. ११·५ लक्ष चात्यांना लायसेन्स दिलेले आहेत, त्याही लवकरच सूत देऊ लागतील. जुन्या गिरण्या बंद कराव्या लागल्या तर स्वयंपूर्ण नसलेल्या गिरण्यांची वाढ करणे आणि ज्यांच्या चात्यांत व मागांत समतोल नाही अशात तो आणणे सरकार पसंत करील. २५,००० चात्या असल्या म्हणजे ती गिरणी स्वतःचे पायावर उभी राहू शकते, असे मानले जाते. सध्या सहकारी क्षेत्रातील ४० आणि खासगी क्षेत्रातील १८२ गिरण्यांतून २५,००० पेक्षा कमी चात्या आहेत. त्यांना स्वयंपूर्ण करावयासच जादा १२५ कोटी रु. ची गुंतवणूक हवी.

---







### भारतातल्या उंदरांवर मात करण्यासाठी दरसाल ३२० कोटी रु. चा खर्च

" भारतात उंदीर दरसाल जेवढे धान्य खाऊन फस्त करतात, तेवढे भारताला एका आगगाडीत घालून पुरवावयाचे म्हटले, तर त्यासाठी २,८०० मैल लांबीची आगगाडी लागेल. २,८०० मैल म्हणजे १,४७,४८,००० फूट. प्रत्येक वाघिणीची लांबी २७५ फूट. म्हणजे, वाघिणींची संख्या ५३,७६,०००. प्रत्येक वाघिणीत १७ मेट्रिक टन धान्य. म्हणजे, एकूण ९१,३९,२०० मेट्रिक टन धान्य. चालू शिकागो भावाप्रमाणे त्याची किंमत ३९,३०,००,००० डॉलर. ३९·३ कोटी डॉलर म्हणजे सुमारे ३२० कोटी रु. भारतातील उंदरांवर हल्ला चढविण्यासाठी अमेरिकेला ३२० कोटी रु. सालिना खर्च येईल. आम्ही शक्य तेवढी मदत देत आहो." — मि. मॉरिस जे. विल्यम.

---

### हिप्पींच्या प्रवेशाला पाकिस्तानची बंदी


गोव्याच्या निसर्गरम्य समुद्रकाठी परदेशातून आलेल्या ६०० नग्न अगर अर्धनग्न हिप्पींनी धुमाकूळ घातल्याच्या वार्ता आल्या आहेत. पणजीमध्ये स्त्रियांनी ह्या प्रकाराचा निषेध करून हिप्पींना गोव्यात येण्यास बंदी करावी अशी मागणीही गोव्याच्या सरकारकडे केली आहे. दरम्यान पाकिस्तानने ह्या परदेशीय पाहुण्यांना देशात प्रवेश करण्यास बंदी केली आहे. बंदी अमलात आणण्यासाठी कस्टम्स खात्याच्या अधिकाऱ्यांनी अनेक नाकी उभारली आहेत. ज्या प्रवाशांजवळ जेवणाराहण्यासाठी लागणारे पुरेसे पैसे नसतील त्यांना सीमेवरच अटकाव करण्यात येईल. पाकिस्तानातील वृत्तपत्रांनी अशी बंदी घालण्यासाठी अलीकडेच मोठी मोहीम सुरू केली होती. हिप्पी अमली पदार्थ चोरून आणतात आणि पाकिस्तानी तरुणांना बिघडवितात असे आरोप करण्यात आलेले आहेत.

---

### चेकने इन्कमटॅक्सचा भरणा— रीबेटसाठी पुरावा

इन्कमटॅक्स भरणारांपैकी कित्येकांनी तक्रार केली होती, की बँक पास बुकातील नोंदीत बँकेने पेमेंट वेअरर चेकचे केले की क्रॉस्ड चेकचे केले, हे स्पष्ट केलेले नसते. म्हणून, सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसनी असे ठरविले आहे की इन्कमटॅक्स भरणारांना इन्कमटॅक्समध्ये रीबेट मिळण्यासाठी पुरावा म्हणून दाखल करण्याकरिता इन्कमटॅक्सच्या भरण्याचे क्रॉस्ड चेक किंवा ड्राफ्ट बँकेकडून परत मिळू शकतील. मात्र, हे चेक किंवा ड्राफ्ट २,५०० रु. पेक्षा जास्त रकमेचे असावयास हवेत. "आपण हे चेक व ड्राफ्ट आठ वर्षांपर्यंत जपून ठेवू आणि इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे ते दाखवू"- असे खातेदारांनी बँकेस लिहून दिले पाहिजे.

---


**GADRE BROTHERS**

**ENGINEERS & FOUNDERS**

MADHAVNAGAR (S. Rly.)

Phone: 318 Gram: 'SEWA

'Sangli. Madhavnagar

सन १९६९—विशेष सेवा वर्ष

अनेक उद्देश साध्य करून देणारी

★ संचित मुदत ठेव ★

( क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खाते )

• व्याज दरात वाढ •

| मासिक हप्ता रुपये | १२ महिने रुपये | २४ महिने रुपये | ३६ महिने रुपये | ६० महिने रुपये |
|---|---|---|---|---|
| ५ | ६२ | १२८ | २०० | ३६२ |
| १० | १२४ | २५७ | ४०० | ७२४ |
| २० | २४८ | ५१४ | ८०० | १४४८ |
| १०० | १२४० | २५६८ | ४००० | ७२४० |

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कचेरी :- राजपथ सातारा

स्थापना १९३६ ◆ शाखा ३७




हे पत्र पुणे पेठ, शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)